CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 3 | Jan. 2020 | Peer Reviewerd


# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948

Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020** **Special Issue – 26 Vol. III**


Chief Editor

**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**

*Guide*

**Dr. B. G. Gaikwad**

Principal

Shivaji College, Hingoli (MS)

*Editor*

**Dr. Balasaheb S. Kshirsagar**

Director , Gandhi Study Center

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Dhale S.U.**

Dept. of Political Science,

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Hurgule N.R.**

Dept. of Sociology,

Shivaji College, Hingoli (MS)

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28, Vol. 3 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी यांचे सत्य अहिंसेविषयक विचार.

सहा.प्रा. आनंद गो. मनवर,
(समाजशास्त्र विभाग प्रमुख),युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावती

**प्रस्तावना :**

20 व्या शतकातील पुर्वाधात महात्मा गांधीनी सत्य अहिंसा या नितीतत्वाचा पुनरुच्चार प्रथम आफ्रीकेत आणि मग भारताच्या स्वातंत्र आंदोलनात केला त्यानंतर त्याचे कार्यक्षेत्र वैयक्तीक जिवनापुरतेच मर्यादित राहीले नाही गांधीना देशातील राजकीय व सामाजीक प्रश्न सोडविण्यासाठी हि तत्वे किती प्रभावी पडतात ते अनेक चळवळीतुन दाखवुन दिले व सर्वसामान्याच्या ठिकाणी आत्मविश्वास व प्रतिकारक्षमता निर्मान केली. त्यांच्या विचारांचा लोकांवर त्याकाळी विलक्षण पगडा बसला आणि लोक त्याच्या पाठीशी उभे राहीले त्या पुर्वी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी हिसांत्मक मार्गाचा वापर केला जात असे परंतु महात्माजींनी मोठ मोठी आंदोलने यशस्वी करुन लोकांचा हा गैरसमज दुर केला. गांधीजी म्हणतात सर्व संघटीत समाजाचा पाया अहिंसा धर्म हा आहे. आजुबाजुला विनाशाचे साम्राज्य पसरलेले असतांना त्यामध्ये जिवन टिकाव धरुन आहे. यावरुन विनाशाहुन श्रेष्ठ असे जिवनाचे एखादे शास्वत नियामक तत्व असले पाहिजे आणि ते आहेच अशी माझी धारणा आहे. असे एखादे सर्व श्रेष्ठ तत्व असेल तरच सुसंघटीत समाजाची उत्पत्ती लागु शकते आणि जिवन जगण्याच्या लायक बनने अर्थात हे तत्व आपल्याला रोजच्या जिवनात प्रयत्न पुर्वक अमलात आणावे लागेल. जेथे जेथे विसंवाह दृष्टीस पडेल जेथे जेथे विरोध उत्पन्न होईल तेथे तेथे त्याला प्रेमाने जिंकले पाहीजे.

सत्य आणि अहिंसा हे अनासक्तीचे दोन आधारस्तंभ आहे. सत्य हि परमोच्च अवस्था आहे त्याला सत्यधर्म असेही म्हणतात. त्यामुळे सत्या विषयाची आसक्ती असणे ही मोक्ष आणि संपुर्ण निवृत्ती आहे. सत्याशी बांधील असणे म्हणजे सर्व बंधनातुन मुक्ती आहे असे गांधीनी म्हटले आहे, सत्य हाच आपल्या जिवनाचा नित्य नियम आहे. अहिंसा हा अनासक्तीचा दुसरा पाया आहे. गांधीच्या अहिसंच्या संकल्पनेवर बौध्द, जैन संप्रदायाच्या विचारांचा प्रभाव आहे. भगवान बुध्द म्हणतात व्देषावर व्देषाने कधीच मात होत नाही, तर प्रेमाने करता येते. मनुष्याने क्रोधावर क्षमाबुध्दीने आणि दृष्ट प्रवृत्तीवर चांगुलपनाने विजय मिळवावा. बुध्दासाठी मानव जाती बद्दलचे प्रेम आणि नैतीक आचरण हाच सर्वश्रेष्ठ त्याग आहे. अहिंसा आचरनात आनल्याने आपन इतरांशी बंधुत्वाने वागतो आणि आपण सर्व मनुष्य एकच आहोत हेपन आपल्याला उमजते. गांधीच्या मते सत्य आणि अहिंसा याच्यात अतुट नाते आहे. गांधी म्हणतात सत्य हेच इश्वर आहे आणि अहिंसा म्हणजे इश्वराविषयीचे स्नेह आहे. कोणही बद्दलच्या वाईट विचाराने सत्याची हाणी होते. म्हणुनच सत्याच्या शोधार्थ अहिंसा हे मुलभूत साधन आहे.

**उद्दिष्टे :**

1. सत्य व अहिंसा ही संकल्पना समजुन घेणे.
2. सत्य व अहिंसा तत्व अभ्यासने.
3. सत्य व अहिंसेचा समाज जिवनावर झालेला परिणाम अभ्यासने.
4. सत्य व अहिंसेचा राजकीय घडामोडीवर झालेला परिणाम अभ्यासने.

**संशोधन पध्दती :**

सदरील शोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील व्दितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, व साप्ताहिक इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

**अहिंसा** :1920 साली त्यांनी म्हटले आहे की, हिंसा हा पशुच्या जिवनाचा कायदा आहे. तर अहिंसा हा मानवी जिवनाचा नियम आहे. पशु हा शारीरिक शक्तीच्या आधारावर जगत असतो. तर मानव अधिक उच्च अशा अहिंसेच्या तत्वावर जगातो. अहिंसा हि पुर्व अवस्था आहे आणि मानव निसर्गता कळत नकळत या अवस्थेत जात आहे.

1935 साली हरिजन या वृत्तपत्रात त्यांनी अहिंसेची व्याख्या पुढील प्रमाणे केली " अहिंसा म्हणजे जगातील कोनासही आपल्या विचांरानी, शब्दांनी आणि वृत्तीने न दुखावने होय."

**सत्य :**

सत्य हा अहिंसेचा मुलभूत घटक आहे. सत्यापासुन अहिंसेची फारकत करता येत नाही, त्यांनी ईश्वर व सत्य यांचा संबंध जोडला आहे. गांधीनी सत्य या संकल्पनेला अत्यंत महत्व दिले आहे. त्यांनी परमेश्वराला सत्य या संकल्पनेच्या ठिकाणी संबोधले आहे. ते म्हणतात सत्य हि ईश्वर है और ईश्वर हि सत्य है.

**सत्य व अहिंसेचा राजकीय घडामोडीवर प्रभाव** :सत्य व अहिंसा या दोहोच्या समन्वयातुन जान्मास येणारी शक्ती म्हणजे सत्याग्रह होय. त्यांनी आपल्या राजकीय जिवनात सत्याग्रहाला अनन्य साधारन स्थान दिले आहे. म्हणुन या प्रभावि मार्गाचा स्वातंत्र आंदोलनात गांधीजीनी अवलंब केलेला दिसुन येतो. हे सत्याग्रहाचे मार्ग म्हणजे त्या ठिकानच्या व्यवस्थेच्या सत्य व अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र मिळविणे होते.

**सत्याग्रहाचे मार्ग :**

**असहकार** :गांधीजीनी या मार्गाचा अवलंब करुन ब्रिटीशांच्या विरोधात व्यापक चळवळ उभी करुन सरकारला त्यांच्या चुकीची जाणीव करुन देते व जनतेने सरकारला सहकार्य केले नाही तर शासनास कारभार चालविले कठीन होते. हे असहकाराच्या मार्गाने सरकार व जनतेच्या लक्षात आणुन दिले.

**सविनय कायदेभंग** :1930–31 मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु कली. राज्यकर्ते भ्रष्ट असतील अश्या देशातील लोकांना कायदयाचे पालन करु नये परंतु हे करत असतांना कोनात्याच प्रकारची हानी होवु नये असे मत सविनय कायदेभंगाच्या चळवळी मागील होते.

**देहत्याग करणे** :राज्यकर्त्याच्या अन्याय व अत्याचारामुळे जिवन जगने असहय होत असल्यास व अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार करणे शक्य नसल्यास देहत्याग करणे फायदयाचे ठरते.

**हरताळ पाळणे** :हरताळाच्या माध्यमातुन राज्यकर्त्याचे हृदय परीवर्तन होण्यास मदत होते. परंतु हरताळ नेहमी करण्यात येवु नये कारण त्यामुळे त्याचे महत्व कमी होते.

**उपोषण** :उपोषन करण्याच्या मार्ग सत्याग्रहाकरीता आवश्यक आहे. त्यामुळे निर्दयी विरोधक व राजकर्त्याचे हृदयपरिवर्तन घडुन येवु शकते. त्यामुळे कठोर उपोषन करण्याची व्यक्तीची तयारी असावी उपोषनाचा मार्ग सत्याग्रहासाठी चांगला असल्याचे महात्मा गांधीचे मत होते.

**सत्य व अहींसेचा सामाजिक घडामोडीवर प्रभाव**: गांधीजीच्या नव्या समाजसेवेची कल्पना त्याच्या अहिसेंच्या तत्वाज्ञानावर आधारलेली होती लोकांच्या नैतिकमानसिक आण आध्यात्मिक. विकासाच्या स्वरुपानूसार नव्या समाज व्यवस्थेची जडनघडन होत असे ते मानमात.

**पंचायत राज** :गांधीजीच्या विचारातील नविन समाजरचना ही स्वयंमपूर्ण स्वरुपाची होती. खेडे किंवा गांव स्वायत्त व मुक्त स्वरुपाची असेल शहरी संस्कृतीच्या प्रभावापासून संपूर्ण वेगळी व अलीप्त स्वरुपाची असेल याचाच अर्थ त्याठीकाणची समाजव्यवस्था साधी सरळ सहकार्याच्या आधावारावर निर्माण झालीली असेल. हे सर्व गाव पातळीवर पंचायतराजच्या धर्तीवर आधारीत समाजव्यवस्था निर्माण करायची होती.

**अहींसक लोकशही** :आदर्श समाज निर्माण करण्याकरीता अहींसंक लोकशाहीच्या माध्यमातून सहकार्याने समाजातील प्रत्येक व्यक्तीने जबाबदारी आणी कर्तव्य पारपाडली तर समाजमध्ये समतोल राखला जाईल व अहींसक स्वरुपाची समाज व्यवस्था निर्माण होईल. तसेच शासनाने दडांत्मक स्वरुपाचा वापर न करता गुन्हेगाराना सुधाण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

**विकेंद्रीकरण** :अहींसेवर आधारीत असलेल्या समाजामध्ये राजकीय आणी सामाजिक विकेंद्रीकरणावर भर देण्यात आला होता. राजकीय विकेंद्रीकरण साध्य करण्याकरीता समाजाला स्वायतत्ता शासनाचे कमीनियत्रंण ग्रामपंचायतीला जास्तीतजास्त अधीकार ागाव पातळीवरील उदयागास प्राध्यान्य देउन विकास केला पाहीजे. त्या मधून खेडे स्वयंपूर्ण होतील.

**अपरीग्रह** :अहींसक समाजामध्ये व्यक्तीच्या गरजा मर्यादेतीत ठेवून मुलभूत गरजांची पूर्ती करुन शांती पूर्ण जीवन जगण्या करीता अपरीग्रह आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रथ :**

1. डॉ. पारीख वा. भा. –आधूनिक भारतीय राजकीय विचारवत, प्रशांत पब्लिकेशन जळगांव
2. केणे. आधूनिक भारतातील राजकीय विचार, सागेपब्लिकेशन नवी दिल्ली.
3. डॉ. बाचल. वी. मा. राज्यशास्त्र पेपर–1 निराली प्रकाशन धुळे.
4. डॉ कठारे.अनील आधूनिक महाराष्ट्राचा इतिहास विदयाबूक पब्लिशर्स औरंगांबाद.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Hingoli

# SHIVAJI COLLEGE, HINGOLI - 431513 (MS)

NAAC Accredited with 'B' Grade

Affiliated to - Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

Organized by - Gandhian Studies Center, Shivaji College, Hingoli

Sponsored by - University Grants Commission, New Delhi

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL LEVEL CONFERENCE

on

**RELEVANCE OF MAHATMA GANDHI IN TODAY'S WORLD**

Sunday, 15 March 2020

# *Certificate*

This is to certify that **Prof.Anand G.Manwar** from **Yuvashakti Arts college, Amravati** has participated in the UGC sponsored One Day Interdisciplinary National Level Conference on **Relevance of Mahatma Gandhi in Today's World** organized by Gandhian Studies Center, Shivaji College, Hingoli Tq.Dist.Hingoli, Maharashtra, India on 15 March 2020.
He presented research paper entitled महात्मा गांधी यांचे सत्य अहिंसे विषयक विचार.

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. B.G.Gaikwad | Dr.Balasaheb S.Kshirsagar | Dr.Dhale S.U. | Dr.Hurgule N.R. |
| Principal & Organizing Secretary | Convener & Coordinator-GSC | Co-convener | Co-convener |